# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई - ४०० ००४.

## निपुण गीत तयार करण्यासाठी गीतकारांसाठी सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार, प्राथमिक स्तरावर सन २०२६-२७ पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यात प्राथमिक पातळीवरील अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केले नाही, असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी भारत सरकारने "समग्र शिक्षा" मध्ये निपुण भारत (National Initiative For Proficiency In Reading With Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता ३ री पर्यंत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान सन २०२६-२७ पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. त्यानुसार राज्यात सन २०२६-२७ पर्यंत इयत्ता ३ री पर्यंतच्या १००% विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता ३ री पुढे गेलेल्या परंतु, अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी "निपुण भारत" अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

समग्र शिक्षा अंतर्गत केंद्र पुरस्कृत निपुण भारत मिशन सुरु करण्यात आलेले आहे. याकरिता निपुण गीत तयार करण्यासाठी गीतकारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

निपुण गीत तयार करणाऱ्या गीतकारांनी विहित नमुन्यात राज्य प्रकल्प संचालक यांच्या नावे वरील पत्त्यावर अर्ज दि. ३०/११/२०२२ संध्याकाळी ५.०० पर्यंत सादर करावेत. दि. ३०/११/२०२२ संध्याकाळी ५.०० नंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

सदर जाहिरातीची प्रक्रिया कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार राज्य प्रकल्प संचालक यांनी राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरित/-
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प. मुंबई.